# नाशिकमध्ये आजपासून हॉटेल आणि रेस्टॉरंट असो.चे अधिवेशन

**नाशिक (प्रतिनिधी):-** हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया या संस्थेतर्फे दि. ७ ते ९ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत नाशिकमध्ये संस्थेचे १९ वे विभागीय अधिवेशन होणार असून या निमित्ताने पश्चिम विभागातील हॉस्पिटॅलिटी उद्योगातील अनेक नामवंत व्यावसायिक नाशिकमध्ये येणार आहेत. या अधिवेशनाचे उद्घाटन भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी दिली.



सुमारे ३ वर्षाच्या खंडानंतर हे पश्चिम विभागीय अधिवेशन होत असून या अधिवेशनात अनेक हॉटेल व रेस्टॉरंटचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार आणि उद्योगातील दिग्गज सहभागी होणार असून ते विविध विषयांवर विचारमंथन आणि संवाद करतील. हॉस्पिटॅलिटी उद्योगापुढील आव्हाने आणि असणाऱ्या संधीची माहिती, नवे तंत्रज्ञान व नव्या उत्पादनाची माहिती तसेच नेटवर्किंगची संधी या अधिवेशनामुळे मिळणार असून पर्यटन क्षेत्रात महत्वाचे शहर असणाऱ्या नाशिकची निवड या अधिवेशनासाठी करण्यात आली असून या अधिवेशनामुळे नाशिकमधील वाईन पर्यटनासोबतच धार्मिक, कृषी, सांस्कृतिक , साहसी पर्यटन तसेच त्यांच्याशी संबंधित अनेक सेवांना मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असेही प्रदीप शेट्टी म्हणाले. 'हियर टू विन' या थीमवर आधारित या अधिवेशनात मोठ्या संख्येने हॉटेल व रेस्टॉरंट व्यवसायिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन देखील शेट्टी यांनी केले.